# UGC Journal Details

| | |
|---|---|
| Name of the Journal : | Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ) |
| ISSN Number : | |
| e-ISSN Number : | 22785655 |
| Source: | UNIV |
| Subject: | Education;Social Sciences(all) |
| Publisher: | Aarhat Education Trust,Mumbai |
| Country of Publication: | India |
| Broad Subject Category: | Multidisciplinary |

Print

KVN Naik Arts, Commerce & Science College, IQAC OFFICE

Co-ordinator
I.Q.A.C.
KVN Naik Arts, Commerce
& Science College, Canada Corner,
Nashik-422 002.

2017-18

Aarhat Publication & Aarhat Journal's

# AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

Peer Reviewed Multidisciplinary Research Journal

ISSN- 2278-5655

Online and Print Journal

EduIndex Impact Factor: 5.18

UGC Approved Journal No 48178, 48818

Vol VII Special Issues No. IV

On

# CONTRIBUTION OF GST IN DEVELOPMENT OF INDIAN ECONOMY

In collaboration with

Kr.V.N Naik Shikshan Prasarak Sanstha's

## Arts, Commerce and Science College, Nashik

Editor

Dr. Shantaram Badgujar
Principal

Mr. Sharad Kakad
HOD – Economics & Co-ordinator

| | | | |
|---|---|---|---|
| 45. | डॉ. मनीषा के. आहेर | जीएसटी : फायदे व तोटे | 255 to 259 |
| 46. | प्रा. सांवत एच. एस | वस्तू व सेवा कर आणि कृत्रिम भाववाढ विशेष संदर्भ – आटपाडी तालुका महाराष्ट्र राज्य | 260 to 263 |
| 47. | प्रा. नाना चव्हाण | वस्तू आणि सेवा कर : एक दृष्टिक्षेप | 264 to 267 |
| 48. | प्रा. वैशाली रत्नाकर गांगुर्डे | वस्तू व सेवा करांचे ग्राहकांवर होणारे परिणाम | 268 to 274 |
| 49. | डॉ. संध्या पुंडलिकराव सोनकांबळे | जीएसटी आणि भारतीय अर्थव्यवस्था | 275 to 277 |
| 50. | प्रा. रावसाहेब भि. मैराळे | वस्तू व सेवा कर – कार्यपद्धती आणि वैशिष्ट्ये | 278 to 282 |
| 51. | प्रा. मनोज बी. गिराम | वस्तू आणि सेवा कर व भारतीय अर्थव्यवस्था | 283 to 286 |
| 52. | ठाकरे विलास रविंद | वस्तू व सेवा कर | 287 to 290 |
| 53. | सांगळे विश्वास अंतु | वस्तू व सेवा कर – फायदे परिणाम | 291 to 295 |
| 54. | कावेरी दशरथ नागरे | वस्तू आणि सेवा कर | 296 to 299 |
| 55. | रिंकु प्रभाकर जाधव | वस्तु व सेवा कर ( जी.एस.टी ) | 300 to 302 |

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
A Peer Reviewed Multidisciplinary Journal UGC Approved Journal No 48178, 48818
Impact Factor 5.18 ISSN 2278-5655

# जीएसटी आणि भारतीय अर्थव्यवस्था

प्रा. डॉ. संध्या पुंडलिकराव सोनकांबळे
*के. व्ही. एन. नाईक महाविद्यालय, नाशिक.*

## प्रास्ताविक :

भारत हा विकसनशील देश आहे. भारतातील अर्थव्यवस्था ही विकसनशिल अर्थव्यवस्था आहे. त्याच बरोबर लोकशाहीप्रधान व कृषिप्रधान असल्यामुळेही लोकांचे कल्याण साधणे व सरकारकडून साध्य होणे हे तेवढेच महत्वाचे असते. त्यामुळे विकास साधावयाचा असेल तर सरकारचा निर्णय, धोरणे व नियोजन या बाबी खुप महत्वाच्या ठरतात. तसेच त्यांचा परिणाम सुध्दा अर्थव्यवस्थेवर होतो. या धोरणाचा परिणाम अनुकुल होईल का प्रतिकुल हे प्रत्येक वेळेस पहाणं तेवढेच महत्वाचे असते कारण सरकारची धोरणं ही सर्व अर्थव्यवस्थेतील ग्रामीण भागापर्यंत परिणाम करतात.

अलिकडील काळात सरकारनी राजकोषीय धोरणात बदल करत असताना मोठया प्रमाणात बदल केले नाही कारण बदल करत असताना कराविषयी कराच्या उत्पन्नातील टक्केवारीमध्ये बदल केले जे परिस्थितीला अनुषंगुन होते. परंतु कर रचनेत बदल झालेले नव्हते. जी. एस. टी हा आतापर्यंतच्या कर रचनेत झालेला मोठा बदल आहे. त्यांच्या परिणामाची चर्चा करत असताना अर्थव्यवस्थेतील सर्वच घटकांवर होणारा परिणाम पहावा लागेल. कर रचनाची व्याप्ती अर्थव्यवस्थेच्या बाबतीत खुप मोठी आणि तेवढीच विस्तारीत आहे. कर रचनेचा केवळ महसुलावर परिणाम होत नाही तर अर्थव्यवस्थेतील दरडोई उत्पन्न, उत्पादन, बाजार, उपभोक्त्याची खरेदीशक्ती, मागणी औद्योगिकीकरण एकूण सर्वच क्षेत्रावर याचा परिणाम होतो.

## उद्‌दिष्टे :

१. जीएसटी आणि भारतीय अर्थव्यवस्थेतील सकारात्मकता पाहणे.

२. जीएसटी चे फायदे व तोटयांचे मुल्यमापन करणे.

## जीएसटी म्हणजे काय?

जीएसटी म्हणजे वस्तु व सेवा कर असून तो वस्तू किंवा सेवांवर हा एकच कर १ जुलै पासून लागू झाला. जीएसटी हा एक अप्रत्यक्ष कराचाच एक प्रकार आहे हा कर उत्पादन, विक्री आयातआणि सेवा या सर्वांवरील राष्ट्रीय पातळीवरील सर्वसमावेशक अप्रत्यक्ष कर आहे केंद्र सरकार आणि राज्य सरकार जे निरनिराळे अप्रत्यक्ष कर लावतात त्या सर्व करांची जागा जीएसटी घेणार आहे.

१९४७ नंतरचे सर्वात महत्वाचे करसुधारण विधेयक म्हणून वस्तू व सेवा कर विधेयकाचे महत्व आहे.

जीएसटीचे फायदे

१) कर भरणे सोपे जाईल कर भरण्याच्या आकारण्याच्या पध्दतीत सहजता आणि सुलभता येईल.

२) कराची चोरी किंवा कर न भरणे किंवा कमी भरणे कमी होईल.

३) संपूर्ण देशात सामान खरेदी करण्यासाठी एकच कर आणि एकाच दराने कर दयावा लागेल पूर्ण देशात एकाच किंमतीला एक प्रकारचे सामान खरेदी करता येईल तुम्ही मुंबईला घ्या दिल्लीला घ्या नाही तर कोलकत्याला घ्या एकाच किंमतीला मिळेल.

४) वेगवेगळया प्रकारचे कर भरण्यापासून सुटका होईल.

५) भारताच्या प्रगतीचा दर १ टक्केवारी ते १.५ टक्केवारी वाढेल.

६) जीएसटी मुळे असंघटीत उद्योगही कराच्या जाळयात येईल त्यामुळे सरकारचे उत्पन्न वाढेल आपण त्याच बरोबर संघटीत व असंघटीत क्षेत्रातील दरी कमी होईल.

७) कर वाचविण्यासाठी कंपन्या आपली उत्पादने राज्यातल्या राज्यातच विकत असत आता तसे न होता ती देशात सर्वत्र विकायला लागतील.

८) एका वस्तूची वेगवेगळया राज्यात वेगवेगळी किंमत असे आता असे न होता सर्वच राज्यात त्या वस्तूची एकच किंमत राहील.

## जीएसटीचे तोटे

१) वस्तू सेवाकर कायदयाचे जसे काही फायदे आहेत तसे तोटेही आहेत. जे संभाव्य तोटे आहेत. ते मध्यमवर्गीयांना परवडणारे असणार नाहीत. तसेच गरीबांना तर खूप अवघड बनेल कारण जीएसटी मुळे महागाईमध्ये वाढ होईल असे भाकीत केले जाते. भारतातील मध्यमवर्गीयांची व गरीबांची संख्या पहाता ही महागाई या दोन आर्थिक कमकुवत वर्गावरच येईल. एकूण भारतातील आर्थिक विषमता पाहता ही विषमता अत्यंत विदारक आहे आणि त्यामध्ये कोणताही बदल झालेला नाही भारतामध्ये २० टक्के लोकांच्या हातामध्ये ८० टक्के संपत्ती आहे आणि उरलेले ८० टक्के लोक हे मध्यमवर्गीय व गरिब आहेत ज्यांच्या हातामध्ये उरलेली २० टक्के संपत्ती त्यामुळे अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून महागाई ही गरिबांनाच त्रासदायक असते म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेतील ८० टक्के लोकांच्या खरेदी शक्तीवर प्रतिकूल परिणाम होईल.

२) वस्तू सेवाकरात १० टक्कयांनी मर्यादा घालण्याचे ठरलेले आहे ते काही अशा कमी जास्त झाले तरी त्यामध्ये खुप मोठा फरक पडणार नाही. ही टक्केवारी पहाता मध्यमवर्गीच्या व गरिबांच्या अखत्यारीत येणाऱ्या किंवा जविनावश्यक वस्तूमध्ये भाववाढ होईल आर्थिक दृष्टिकोनातून ही भाववाढ झाल्यामुळे बाजारात उपभोक्त्यांचा मोठा वर्ग जो मध्यमर्व व गरीब आहे त्यावर परिणाम होवून तेवढी मागणी आगोदर होती तेवढी नक्कीच रहाणार नाही म्हणजेच केन्सच्या म्हणण्यानुसार प्रभावी मागणी अस्तित्वात येणार नाही जी प्रभावी मागणी कमी झाली तर रोजगार वाढणार नाही. प्रत्येक क्षेत्रात अशीच जीएसटी मुळे महागाई वाढल्यास त्या महागाईचा ज्या उपभोक्त्यांवर परिणाम होईल त्यामुळे मागणी कमी होवून उत्पादन कमी, रोजगार कमी, औद्योगिकीकरण कमी, बेकारीत वाढ या शक्यता नाकारता येत नाहीत.

भारतीय अर्थव्यवस्थेतील ८० टक्के लोकांच्या खरेदी शक्तीवर प्रतिकूल परिणाम होईल. जे संभाव्य तोटे आहेत. ते मध्यमवर्गीयांना परवडणारे असणार नाहीत. आर्थिक दृष्टिकोनातून ही भाववाढ झाल्यामुळे बाजारात उपभोक्त्यांचा

मोठा वर्ग जो मध्यमवर्ग व गरीब आहे त्यावर परिणाम होवून तेवढी मागणी आगोदर होती तेवढी नक्कीच रहाणार नाही प्रभावी मागणी अस्तित्वात येणार नाही. उत्पादन कमी औद्योगिकीकरण कमी, बेकारीत वाढ त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील आर्थिक दृष्टिकोनातून नकारात्मकता परिणाम होईल.

सारांश

जीएसटी चे अनेकविध फायदे–तोटे पाहिले तरी जीएसटी चे फायदे कोणाला व जीएसटी चे तोटे कोणाला होतात हे पाहणे भारतासारखा विकसनशिल देशासाठी पाहणे आवश्यक आहे कारण जीएसटी एक सर्व क्षेत्रालाही सर्वसमावेश परिणाम करणारी राजकोषीय धोरणातील मोठी घटना किंवा बदल आहे म्हणून त्याचे तोटे पाहात असताना ते तोटे सहन करणारा गट उत्पन्नदृष्टया कसा आहे हे पाहणे सुध्दा महत्वाचे आहे. तोटे होणाऱ्या लोकांमध्ये भारतीय लोकसंस्थेचा किती भाग येतो हे आकडेवारी पहाणे सुध्दा महत्वाचे आहे कारण लोकसंख्यामध्येच उपभोक्ता येतो तोच उत्पन्न मिळविणारा असेल व उत्पादन करणारा असेल. तर लोकसंख्येतील मोठया वर्गाला होणारा तोटयाचा परिणाम नक्कीच आर्थिक विकासावर झाल्याशिवाय राहणार नाही.

## संदर्भ -

1 भारतीय अर्थव्यवस्था - भागीरथ प्रकाशन

2 भारतीय अर्थव्यवस्था - दीपस्थंभ

3 योजना मासिक - ऑगस्ट २०१७